महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा. क्र. ना. बँका/डी-४/पतसंस्था/एन.पी.ए./२००४/८०२
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक १०-११-२००४

# परिपत्रक

भारत सरकारने आर्थिक उदारीकरणाची निती १९९१ मध्ये अवलंबल्यानंतर देशाच्या औद्योगिक व व्यापार धोरणात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन झालेले आहे. या क्षेत्रातील उलाढाल वाढ होण्यास मदत व्हावी म्हणून आर्थिक क्षेत्रात (Financial Sector) मध्ये सुधारणा होणेसाठी शासनाने नरसिंहम् समिती नेमली. समितीने भारतीय बँकिंग, लेखा पद्धती व (Accounts standards) मानके संबंधी अभूतपूर्व सुधारणांसाठी शिफारस केली. त्यामुळे गेल्या १० वर्षापासून राष्ट्रीयीकृत/खाजगी व नागरी सहकारी बँकांचे लेखापद्धतीत सुधारणा झाली आहे. त्यासाठी आर. बी. आय. ने बँकांसाठी Prudential Norms निर्गमित केले. त्यामुळे भारतीय बँकिंग व्यवस्थेत प्रत्यक्ष उत्पन्नावर आधारीत Asset Classification करण्यात आले. सुरुवातीचे काळात नागरी बँकांनाही ही पद्धत अडचणीची वाटली. तथापी बँकांचे आर्थिक व्यवहार समृद्धीसाठी ही पद्धत आवश्यक होती हे कोणीही नाकारणार नाही. सहकारी चळवळीमध्ये महाराष्ट्र राज्य हे देशात अग्रेसर असे राज्य आहे. नागरी सहकारी बँकांसारख्याच राज्यात मोठ्या प्रमाणावर नागरी सहकारी पतसंस्था व बिगरशेती सहकारी पतसंस्था अस्तित्वात आलेल्या आहेत. जवळपास २२,००० पतसंस्थांमध्ये जनतेच्या सुमारे रु. ३०,००० कोटींच्या ठेवी आहेत. पतसंस्था चळवळीवर जनतेने टाकलेला विश्वास वृद्धींगत व्हावा, तसेच संस्थांही आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हाव्यात यासाठी पतसंस्थांमध्ये नागरी बँका/राष्ट्रीयीकृत बँका/खाजगी बँकांमध्ये अस्तित्वात असलेली लेखा पद्धत अंमलात आणण्याचे विचार चालू होते. गेल्या काही वर्षाचा अनुभव लक्षात घेता पतसंस्था नोंदणीनंतर लवकरच धोक्यात येतात. त्यामुळे ठेवीदाराचे हितही धोक्यात येते. अनेक चांगल्या मानल्या जाणाऱ्या संस्था अलिकडच्या काळात अवसायनात गेलेल्या दिसतात. त्यामुळे पतसंस्थांवरील जनतेचा विश्वास कमी होऊन चळवळ धोक्यात आलेली आहे असे वाटू लागले आहे. वित्तीय व्यवहारात काही प्रमाणात जोखीम असू शकते हे लक्षात घेऊन संस्थांनी त्या जोखमीवर मात करता येईल अशाप्रकारची व्यवस्था आपल्या लेखा पद्धतीत ठेवणे आवश्यक आहे. या सर्वांचा विचार करून नागरी बँका/राष्ट्रीयीकृत बँका व खाजगी बँका यांचेसाठी आर. बी. आय. ने जी लेखा पद्धत निश्चित केली आहे तशाच प्रकारची पद्धत पतसंस्थांच्या कारभारात यावी यासाठी सोबत मार्गदर्शक सूचना जोडलेल्या आहेत.

पतसंस्था या स्थानिक स्तरावर काम करतात. छोट्या भागभांडवलातून त्यांची सुरुवात होते व त्यामध्ये हळूहळू भर पडते. सुरुवातीच्या काळात जोखीम पत्करण्याची ताकद कमी असल्याने संस्थांना त्यांचा निधी काळजीपूर्वक हाताळावा लागतो. एखादे कर्ज एन.पी.ए. झाले तर त्यासाठी तरतूद करणे हे एक त्याच्यातील महत्वाचा भाग होय. आतापर्यंत चालत आलेल्या लेखा पद्धतीमध्ये १००% बदल

लगेच केला तर पतसंस्थांना त्यांची अंमलबजावणी करणे अवघड होईल म्हणून एन.पी.ए. नॉर्मस टप्प्याटप्प्याने लागू करणे आवश्यक आहे. दिनांक ३१-३-२००५ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षापासून सदर तरतूदी लागू करण्यात येत आहेत. या परिपत्रकाद्वारे उत्तम किंवा नियमित कर्जासाठी तरतूद करण्यात आलेली नाही. मात्र अनियमित कर्ज ५%, संशयित कर्ज अ. क्र. १, २ व ३ साठी अनुक्रमे तारणी / विनातारणी तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार संशयित कर्ज क्रमांक १ साठी तारणी १०% विनातारणी ५०%, संशयित कर्ज क्र. २ साठी तारणी १५% विनातारणी ५०%, संशयित कर्ज क्रमांक ३ साठी तारणी २०% व विनातारणी ५०% तर बुडीत कर्जासाठी १००% तरतूद करावयाची आहे. या सूचनांचे पालन सर्व नागरी/ग्रामीण बिगरशेती/पगारदार सहकारी पतसंस्थांकडून केले जाईल असे पहावे.

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

प्रति, :

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (ले.प.) (सर्व)
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४) जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था (सर्व)
५) तालुका उपनिबंधक/सहाय्यक सहकारी संस्था (सर्व)

## अनुत्पादक जिंदगी (NPA) :

## नागरी सहकारी पतसंस्था :

अनेक नागरी सहकारी पतसंस्था त्यांचे वार्षिक ताळेबंद, हिशेबपत्रक तयार करताना प्रत्यक्षात वसूल न झालेले व्याज उत्पन्न धरून नफा जाहीर करतात. त्या अनुषंगाने लाभांशही जाहीर करतात. इतकेच नव्हेतर निधीसुद्धा न मिळालेल्या उत्पन्नातून करताना निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे ताळेबंदामध्ये पतसंस्थांची खरी आर्थिक स्थिती दाखविली जात नाही. संस्थेचे सभासद, इतर संस्था व शासनापुढे संस्थेच्या आर्थिक स्थैर्याचे चुकीचे चित्र उभे केले जात असल्याचेही निदर्शनास आलेले आहे.

नरसिंहम् समितीने नागरी सहकारी बँकांचे ताळेबंद पारदर्शक असावेत व त्यामध्ये मालमत्तेचे वर्गीकरण योग्यप्रकारे करण्यात यावे अशा शिफारशी केल्या होत्या व त्याप्रमाणे मालमत्तेचे उत्पादक (Performing) व अनुत्पादक (Non performing) असे दोन भाग केले जातात.

नरसिंहम् समितीच्या शिफारशी नागरी सहकारी पतसंस्था या आर्थिक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याने पतसंस्थांच्या लेखापद्धतीत एकसूत्रीपणा व पारदर्शकता आणण्यासाठी व संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी नागरी सहकारी पतसंस्थांनाही एनपीए निकष लागू करणे अत्यंत आवश्यक आहे.

## अनुत्पादक जिंदगी (NPA) म्हणजे काय?

नागरी सहकारी पतसंस्थांचे ताळेबंद आणि हिशेबपत्रक योग्य आर्थिक स्थिती दर्शविणारे असावेत. उत्पन्नक्षमता नसलेल्या कर्ज खात्यावर आकारलेले व्याज प्रत्यक्ष वसूल झाल्याखेरीज व्याज उत्पन्न धरू नये. हे यामध्ये मुख्य तत्व आहे आणि म्हणूनच ज्या कर्जखात्यातून अथवा इतर मालमत्तेपासून उत्पन्न मिळत नाही असे कर्ज खाते अथवा मालमत्ता उत्पन्नक्षमता नसलेली एनपीए समजावे. म्हणजेच एखादे कर्ज (मालमत्ता) उत्पन्न निर्मिती करण्यास असमर्थ ठरते अथवा उत्पन्न निर्मिती करत नाही तेंव्हा ते कर्ज (मालमत्ता) एनपीए समजावे.

एनपीए म्हणजे एखाद्या कर्जखात्यावरील (मालमत्तेवरील) व्याज/कर्जाचा हप्ता हा ठरवून दिलेल्या कालावधीनंतरही वसूल न झाल्यास असे खाते एनपीए होय.

दि. ३१ मार्च २००५ पासून पतसंस्थांसाठी एनपीएसाठी ठरवून दिलेला कालावधी खालीलप्रमाणे असेल.

| अ. क्र. | वर्षाअखेर ३१ मार्च | एनपीए ठरवून दिलेला थकीत कालावधी/निकष |
|---|---|---|
| १) | २००५ | ४ तिमाही (१२ महिने) |
| २) | २००६ | २ तिमाही (१२ महिने) |
| ३) | २००७ | ३ तिमाही (९ महिने) |
| ४) | २००८ | २ तिमाही (६ महिने) |

## थकबाकी आणि एनपीए :

जेंव्हा ठरलेल्या कर्जाचा हप्ता/व्याज भरले जात नाही तेंव्हा ते खाते/रक्कम थकबाकी मानली जाते. थकबाकी भरणा करण्याच्या नियत तारखेशी संबंधीत असतो.

एनपीए खात्याचा ठराविक मुदतीशी संबंध असतो. उदा. ३६० दिवस कर्जाचा हप्ता/व्याज न आल्यास खाते एनपीए होते म्हणजेच विनिर्दिष्ट कालावधीत कर्जाचा हप्ता/व्याज न आल्यास खाते एनपीए समजले जाते.

## मालमत्तेचे वर्गीकरण (Asset Classification) :

रिझर्व्ह बँकेने १९९३ पासून नागरी सहकारी बँकांना अनुत्पादक जिंदगी (NPA) ही संकल्पना लागू केली. नागरी सहकारी पतसंस्थांबाबत कोणत्याही कर्जखात्यातील थकबाकीची रक्कम म्हणजेच कर्जाचा हप्ता किंवा व्याज जर ४ तिमाही (१२ महिने) पेक्षा अधिक काळ थकीत राहिले तर असे कर्ज किंवा खाते उत्पन्नक्षमता नसलेले खाते समजण्यात आलेले आहे. संस्थांनी अशा खात्यावर व्याज लावू नये. (व्याज काढणेत यावे परंतु खात्यावर आकारणी करू नये.) दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कर्जखाते एनपीए ठरविताना कर्जदार अथवा जामिनदार यांनी दिलेले तारण अथवा त्याची खरी किंमत विचारात घेऊ नये तर अशा तारणाच्या किंमतीचा विचार एनपीए तरतूद (Provision) करताना करावा लागतो. नागरी सहकारी पतसंस्थांनी ३१ मार्च अखेर एनपीए खात्यात कर्जाचा हप्ता/व्याज रक्कम जर जमा झाली नसेल तर त्याप्रमाणे एनपीए चे वर्गीकरण कालावधीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे करावे.

### १) उत्तम कर्ज खाते / नियमित कर्ज खाते :

ज्या खात्यात हप्ता आणि व्याज नियमितपणे जमा होते किंवा खात्यात कर्जाचा हप्ता किंवा येणे व्याज सन २००६ पर्यंत ४ तिमाही (१२ महिने), २००७ तीन तिमाही सन २००८ साली दोन तिमाहीपेक्षा कमी येणे असेल तेंव्हा ते खाते उत्तम / नियमित खाते समजावे. उत्तम खात्यात वसुली संदर्भात काहीही अडचण नसते.

### २) अनियमित कर्जखाते (Sub Standard Asset) :

जे कर्जखाते एनपीए म्हणजे उत्पन्नक्षमता नसलेले म्हणून सतत २४ महिन्यापेक्षा जास्त नाही अशा काळापर्यंत राहिले आहे.

### ३) संशयित कर्ज खाते (Doubtful Asset) :

जे खाते २४ महिन्यापेक्षा जास्त काळापर्यंत एनपीए म्हणजे उत्पन्नक्षमता नसलेले म्हणून राहते असे खाते संशयित कर्ज खाते म्हणून ३१ मार्च २००५ पासून समजावे.

| | | |
|---|---|---|
| अ) | संशयित १ (Doubtful I) | २४ महिने ते ४८ महिने |
| ब) | संशयित २ (Doubtful II) | ४८ महिनेपेक्षा जास्त ते ६० महिने |
| क) | संशयित ३ (Doubtful III) | ६० महिनेपेक्षा जास्त |

## ४) बुडित कर्ज खाते (Loss Asset) :

जे कर्जखाते वसूल होणे अशक्य आहे. कर्जासाठी दिलेल्या तारणाचे काहीही वसुलीक्षम मूल्य नाही किंवा त्याचे मूल्य अत्यंत अल्प आहे अशा खात्याचे वर्गीकरण बुडित कर्ज खाते म्हणून करावे.

### मालमत्ता / कर्जाची वर्गवारी व त्यावरील तरतूद

| अ. क्र. | वर्गवारी | अनुत्पादकतेचा कालावधी | करावयाची तरतूद (येणे रकमेवर) | |
|---|---|---|---|---|
| १) | उत्तम किंवा नियमित कर्ज (Standard) | – | – | |
| २) | अनियमित कर्ज (Sub standard) | १२ महिन्यांपेक्षा जास्त व २४ महिन्यांपर्यंत | ५% | |
| ३) | संशयित कर्ज (Doubtful) | | तारणी | विनातारणी |
| | अ) संशयित १ (Doubtful 1) | २४ महिन्यांपेक्षा जास्त ४८ महिन्यापर्यंत | १०% | ५०% |
| | ब) संशयित २ (Doubtful 2) | ४८ महिन्यांपेक्षा जास्त ६० महिन्यांपर्यंत | १५% | ५०% |
| | क) संशयित ३ (Doubtful 3) | ६० महिन्यांपेक्षा जास्त | २०% | ५०% |
| ४) | बुडीत कर्ज | लेखापरिक्षकाने नमूद केलेप्रमाणे | १००% | १००% |

**टिप : वरील तरतुदी रु. १० हजारापेक्षा जास्त कर्जासाठीच लागू कराव्या.**

वरील मालमत्ता/कर्जाची वर्गवारी व त्यावरील तरतुदी याच्या अनुषंगाने स्पष्टीकरणासाठी खालील उदाहरणे देता येतील.

### १) उत्तम जिंदगी (Standard Asset) चे उदाहरण :

१२ महिन्यांपेक्षा कमी हप्त्यांचे मुद्दल व व्याज रक्कम थकीत असलेस सदर खाते उत्तम जिंदगी समजणेत येईल. यावर तरतूद करणेची आवश्यकता नाही. हेच खाते पुढे सतत १२ महिने व त्यापेक्षा जास्त कालावधीकरिता व्याज व मुद्दल मिळून हप्त्याने थकीत राहिल्यास ते एनपीए समजण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| उदा. | कर्जदाराचे नाव | अ |
| | कर्ज रक्कम | रु. ५० हजार |
| | कर्ज दिल्याची तारीख | १-४-२००४ |
| | कर्जाचा पहिला हप्ता सुरु दिनांक | १-५-२००४ |
| | या कर्जखात्यामध्ये वसुली काहीही आलेली नाही असे समजून दि. ३१-३-०५ अखेर थकीत हप्ते संख्या | ११ |

| | |
|---|---|
| एनपीए वर्गवारी | उत्तम जिंदगी (Standard Asset) |
| तरतूद | आवश्यक नाही |

## २) अनियमित जिंदगी (Sub Standard Asset) चे उदाहरण :

१२ महिनेपेक्षा जास्त २४ महिन्यापर्यंत (एकूण २४ हप्ते थकीत) ज्या खातेवर व्याज व मुद्दल मिळून हप्ते थकीत आहेत असे खाते अनियमित कर्जखाते (Sub Standard Asset) समजले जाईल.

| | | |
|---|---|---|
| उदा. | कर्जदाराचे नाव | अ |
| | कर्ज रक्कम | रु. ५० हजार |
| | कर्ज दिल्याची तारीख | १-४-२००३ |
| | कर्जाचा पहिला हप्ता सुरु दि. | १-५-२००३ |
| | दरमहा हप्ता | रु. १,२००/- |
| | एकूण वसुली | रु. ५,०००/- |
| | संपूर्ण आलेले हप्ते (५०००/१२-४.१६) | ४ |
| | दि. ३१-३-२००५ अखेर अपेक्षित येणे हप्ते संख्या | २३ |
| | एकूण थकीत हप्ते संख्या (२३-४) | १९ |
| | एनपीए वर्गवारी | अनियमित जिंदगी (Sub Standard Asset) |
| | तरतूद (येणे बाकीवर) | ५% |

## ३) संशयित जिंदगी (Doubtful Asset) चे उदाहरण :

अ) २४ महिनेपेक्षा जास्त ४८ महिन्यापर्यंत (एकूण ४८ हप्ते थकीत) ज्या खातेवर व्याज व मुद्दल मिळून हप्ते थकीत आहेत असे खाते Doubtful 1 असे समजण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| उदा. | कर्जदाराचे नाव | अ |
| | कर्ज रक्कम | रु. ५० हजार |
| | कर्ज दिल्याची तारीख | १-४-२००२ |
| | कर्जाचा पहिला हप्ता सुरु दिनांक | १-५-२००२ |
| | दरमहा हप्ता | रु. १,२००/- |
| | एकूण वसुली | रु. ५,०००/- |
| | संपूर्ण आलेले हप्ते (५,०००/१२-४.१६) | ४ |
| | दि. ३१-३-०५ अखेर अपेक्षित येणे हप्ते संख्या | ३५ |
| | एकूण थकीत हप्ते संख्या (३५-४) | ३१ |
| | एनपीए वर्गवारी | संशयित जिंदगी (Doubtful !) |

| | |
|---|---|
| तरतूद | तारणी येणेबाकीवर १०% |
| | विनातारणी येणेबाकीवर ५०% |

ब) ४८ महिनेपेक्षा जास्त ६० महिन्यांपर्यंत (एकूण ६० हप्ते थकीत) ज्या खातेवर व्याज व मुद्दल मिळून हप्ते थकीत आहेत असे खाते Doubtful II असे समजण्यात येईल.

उदा.

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव | अ |
| कर्ज रक्कम | रु. ५० हजार |
| कर्ज दिल्याची तारीख | १-४-२००० |
| कर्जाचा पहिला हप्ता सुरु दिनांक | १-५-२००० |
| दरमहा हप्ता | रु. १,२००/- |
| एकूण वसुली | रु. ५,०००/- |
| संपूर्ण आलेले हप्ते (५,०००/१२-४.१६) | ४ |
| दि. ३१-३-०५ अखेर अपेक्षित येणे हप्ते संख्या | ५९ |
| एकूण थकीत हप्ते संख्या (५९-४) | ५५ |
| एनपीए वर्गवारी | संशयित जिंदगी (Doubtful II) |
| तरतूद | तारणी येणेबाकीवर १५% |
| | विनातारणी येणेबाकीवर ५०% |

क) ६० महिन्यापेक्षा जास्त : ज्या खातेवर व्याज व मुद्दल मिळून हप्ते थकीत आहेत असे खाते Doubtful III असे समजण्यात येईल.

उदा.

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव | अ |
| कर्ज रक्कम | रु. ५० हजार |
| कर्ज दिल्याची तारीख | १-४-१९९९ |
| कर्जाचा पहिला हप्ता सुरु दिनांक | १-५-१९९९ |
| दरमहा हप्ता | रु. १,२००/- |
| एकूण वसुली | रु. ५,०००/- |
| संपूर्ण आलेले हप्ते (५,०००/१२-४.१६) | ४ |
| दि. ३१-३-०५ अखेर अपेक्षित येणे हप्ते संख्या | ७१ |
| एकूण थकीत हप्ते संख्या (७१-४) | ६७ |
| एनपीए वर्गवारी | संशयित जिंदगी (Doubtful III) |
| तरतूद | तारणी येणेबाकीवर २०% |
| | विनातारणी येणेबाकीवर ५०% |

संशयित कर्जे (Doubtful) च्या तारणी, विनातारणी तरतुदींचे स्पष्टीकरण खालील उदहरणाने स्पष्ट होईल.

१) कर्जबाकी रु. ४५,०००/- २) तारणी कर्जे रु. ३०,०००/-

३) विनतारणी कर्जे (१-२) रु. १५,०००/-

| एनपीए वर्गीकरण | एनपीएचा कालावधी | तरतूद प्रमाण | | कर्जबाकी | | तरतूद रक्कम | | एकूण तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तारणी | बिनतारणी | तारणी | बिनतारणी | तारणी | बिनतारणी | |
| संशयित | २४ ते ४८ महिन्यांपर्यंत | १०% | ५०% | ३०,००० | १५,००० | ३,००० | ७,५०० | १०,५०० |
| संशयित | ४८ ते ६० महिन्यांपर्यंत | १५% | ५०% | ३०,००० | १५,००० | ४,५०० | ७,५०० | १२,५०० |
| संशयित | ६० महिन्यां पेक्षा जास्त | २०% | ५०% | ३०,००० | १५,००० | ६,००० | ७,५०० | १३,५०० |

४) बुडित कर्ज (Loss Asset) चे उदाहरण :

जे कर्जखाते वसूल होणे अशक्य आहे व कर्जासाठी दिलेल्या तारणाचे वसूलक्षम मूल्य काहीही नाही (तारणाची विक्री करून काहीही रक्कम मिळणे शक्य नाही असे तारण) किंवा अत्यल्प आहे व असे खाते लेखापरिक्षकाने बुडित कर्ज प्रमाणित केले तर असे खाते बुडित खातेत वर्गीकरण करून संपूर्ण येणेबाकीवर १००% तरतूद करावी लागेल.

## एनपीए बाबतच्या सूचना :

### १) उत्पन्न निश्चितीचे धोरण (Income recognition)

अ) उत्पन्न निश्चिततेच्या धोरणाचा मूळ उद्देश व पाया हा प्रत्यक्ष वसुलीनंतरच उत्पन्न ग्राह्य धरणे हा होय. म्हणजेच व्याज येणे आहे मात्र प्रत्यक्ष वसुली नाही म्हणून ते व्याज उत्पन्न म्हणून दाखविता येणार नाही. आंतरराष्ट्रीयस्तरावर प्रत्यक्ष उत्पन्न हाती आल्यानंतरच ते उत्पन्न म्हणून दाखविले जाते. येणे उत्पन्न हे प्रत्यक्षात उत्पन्न म्हणून दाखविले जात नाही म्हणून पतसंस्थांनी एनपीए खात्यावर व्याज आकारू नये व ते उत्पन्न म्हणून दाखवू नये.

ब) कर्जाचे अनुत्पादक कर्जात वर्गीकरण करताना मुदत्त ठेवीवरील कर्ज तसेच एनएससी, इंदिरा / किसान विकास पत्रे इत्यादी बचत कर्जे विचारात घेऊ नये म्हणजेच अशा कर्जाचे अनुत्पादक कर्जात वर्गीकरण करु नये. मात्र सदर खात्यावर योग्य तो दुरावा असणे आवश्यक आहे. म्हणजेच अशा तारणावरील येणे व्याज उत्पन्नात धरणेस हरकत नाही.

उत्पन्न संकल्पनेचा संबंध हा प्रामुख्याने कर्ज व्यवहारात मिळणाऱ्या व्याजाशी आहे. जोपर्यंत व्याजाची रक्कम प्रत्यक्ष जमा होत नाही तोपर्यंत ती रक्कम उत्पन्न म्हणून धरू नये हे मुख्य तत्त्व होय.

३१ मार्च अखेर जर एखादे खाते एनपीए झाले तर अशा खात्यावर नावे टाकलेले व्याज प्रत्यक्ष वसूल न झाल्यास अशा रकमेची तरतूद करावी आणि जमा नावे नफ्यात धरू नये व सदर येणे व्याज या सदराखाली दाखवावे.

**२) एनपीए खात्यावर व्याज वसूल न झाल्यास काय करावे?**

एनपीए खातेवर व्याज नावे न टाकता ताळेबंदात वेगळे दाखवावे. एनपीए खात्यावरील येणे व्याज दोन प्रकारामध्ये मोडते, पैकी अ) खातेवर नावे टाकलेले व उत्पन्नात धरलेले, परंतु वसूल न झालेले व्याज, ब) खातेवर नाव न टाकलेले व्याज.

या दोन्ही व्याजासंदर्भात खालीलप्रमाणे व्यवहाराच्या नोंदी कराव्यात,

अ) खातेवर नावे टाकलेले व उत्पन्नात धरलेले, परंतु वसूल न झालेले व्याज. नफा-तोटा (उत्पन्न) खाते (P&L) नावे थकीत येणे व्याज (Overdue Interest Reserve) जमा,

ब) खातेवर नावे न टाकलेले व्याज : येणे व्याज (Interest Receivable) (Asset side) नावे थकीत येणे व्याज (Overdue Interest Reserve) जमा,

वरीलप्रमाणे तरतुदी केल्यानंतर प्रत्यक्षात व्याजाची वसुली झाल्यास म्हणजेच रक्कम खातेवर जमा झाल्यास खालीलप्रमाणे व्याजाच्या नोंदी उलटवून घ्याव्यात.

अ) खातेवर नावे टाकलेले व उत्पन्नात धरलेले, परंतु वसूल न झालेले व्याज थकीत येणे व्याज (Overdue Interest Reserve) नावे नफा-तोटा (उत्पन्न) खाते (P&L) जमा,

ब) खातेवर नावे न टाकलेले व्याज १) थकीत येणे व्याज (Overdue Interest Reserve) नावे येणे व्याज (Interest Receivable) (Asset side) जमा २) संबंधीत कर्जखाते.....नावे नफा-तोटा (उत्पन्न) खाते......जमा,

पतसंस्थांनी वरील दोन्ही प्रकारच्या थकीत येणे व्याजाच्या केलेल्या तरतुदींच्या खात्याची यादी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. अशाप्रकारे थकीत येणे व्याज खात्यावर दाखविलेली रक्कम ही रिझर्व्ह / स्वनिधी नसल्याने ताळेबंदात इतर येणी या सदरात दाखवावे. तसेच वर्षभर एनपीए असलेले खाते कर्जदाराने जर ताळेबंदाला अंतिम स्वरुप देण्यापूर्वी सर्व बाबी पूर्ण करून नियमित केल्यास ते खाते ३१ मार्च रोजी एनपीए मानण्याची आवश्यकता नाही.

३) **एक व्यक्ती विविध कर्जे** : एखाद्या कर्जखात्याचे एनपीए म्हणून वर्गीकरण करताना एकाच व्यक्तीस अनेक संस्थांतून अथवा एकाच निरनिराळ्या शाखांतून एक किंवा वेगवेगळ्या स्वरुपाची कर्जे दिली असल्यास व त्यापैकी कोणतेही एक कर्ज जर एनपीए झाले असेल तर त्या व्यक्तीच्या सर्व कर्ज व्यवहारास एनपीए समजून आवश्यक ती तरतूद करावी. याबाबत सर्वात खालच्या पातळीवरील वर्गीकरणाच्या आधारावर इतर सर्व खात्यांचे वर्गीकरण करावे.

४) **एकत्रित कर्ज (Consortium Finance)** : एकाच कर्जदाराला जेव्हा अनेक पतसंस्था एकत्र येऊन कर्ज देतात तेव्हा त्या कर्जाच्या परतफेडीबाबत प्रत्येक संस्थेचा अनुभव वेगळा असू शकतो. त्यामुळे प्रत्येक संस्थेने आपापले कर्जाचे वर्गीकरण स्वतंत्रपणे करावयाचे आहे.

५) **तारणाची वसुली योग्य किंमत कशी ठरवावी?**

अ) **स्थावर मालमत्ता** : साधारणतः दोन वर्षापर्यंत / दोन वर्षापूर्वीचे मूल्यांकन प्रमाणपत्र

ब) **यंत्रसामुग्री** : Plant & Machinery - प्रतिवर्षी १० ते १५% घसारा वजावट करावा. तसेच यंत्रसामुग्री उत्तम स्थितीत असावी, कालबाह्य नसावी व तसा रिपोर्ट दप्तरी असावा.

क) **मालसाठा** : अगदी अलिकडील किमान एक महिनापूर्वीचे मालसाठा प्रमाणपत्र (Stock Statemetnt) आवश्यक रु. १० लाखापेक्षा जास्त मर्यादेसाठी एकदा स्टॉक व्हेरिफिकेशन करून घ्यावे.

## ६) कर्ज खात्याव्यतिरिक्त अनुत्पादित मालमत्तेत समाविष्ट होणाऱ्या इतर बाबी.

अ) ज्या गुंतवणुकीवरील व्याज वसूल होत नसेल अशा गुंतवणुकीसही वरील कालावधीप्रमाणे निष्क्रिय जिंदगी, अनुत्पादक मालमत्तेचे निकष लागू राहतील व त्याही तरतुदीस पात्र आहेत.

ब) ठेव तारण कर्ज, एनएससी तारण अशा कर्जात येणे कर्जाचे मूल्य तारणापेक्षा जास्त झाल्यास अशा फरकाची रकमेला अथवा बचत व चालू ठेव खात्यातील नावे बाक्या अनुत्पादित मालमत्तेचे निकष लागू राहतील.

संस्थेची जी रक्कम अफरातफरीमध्ये अडकलेली असेल त्याची १००% तरतूद करावी. ताळेबंदाचे दिवशीचे अनुत्पादित मालमत्तेचे स्टेटमेंट सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे अहवालात प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. ताळेबंदाच्या दिवशी तक्ता क्र. २ प्रमाण काढलेल्या निव्वळ मालमत्ता व निव्वळ अनुत्पादित मालमत्ता यांचे प्रमाण २०% चे वर गेल्यास सदर संस्था ही कमकुवत/आजारी घोषित करण्यात येईल.

**अनुत्पादक जिंदगीबाबत (एनपीए) अहवाल सादर करणे.**

अ) प्रत्येक वर्षी पतसंस्थांनी ३१ मार्च अखेरीला NPA बाबत संस्थेचे लेखापरिक्षण पूर्ण झाल्यावर अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. सदरचा अहवाल सोबत जोडलेल्या नमुन्यात असावा.

ब) एनपीए ची आकडेवारी सादर करताना ढोबळ एनपीए (Gross NPA) निव्वळ एनपीए (Net NPA) काढताना खालील तक्ता विचारात घ्यावा.

| अ. क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १) | एकूण कर्ज (Gross advance) | |
| २) | एकूण अनुत्पादित कर्ज (Gross NPA) | |
| ३) | अनुत्पादित कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण अ. क्र. २/१×१०० | |
| ४) | वजावट (Deductions) थकीत व्याज तरतूद (Overdue Interset Reserve) नफा-तोटा खात्यातून निर्माण केलेली थकीत व्याज तरतूद एनपीए खात्यापोटी अनामत खात्याला जमा असलेल्या रकमा | |
| ५) | एकूण संशयित बुडित कर्ज तरतूद (            ) | |
| ६) | निव्वळ कर्ज (Net Advance) (१-४-५) | |
| ७) | निव्वळ अनुत्पादित कर्ज (Net NPA) (२-४-५) | |
| ८) | निव्वळ अनुत्पादित कर्जाचे निव्वळ कर्जाशी प्रमाण (७/६ × १००) | |

क) पतसंस्थांनी प्रत्येक वर्षी ३१ मार्च अखेर एनपीए चे वर्गीकरण आणि तरतूदीबाबत माहिती वैधानिक लेखापरिक्षकाकडून तपासून घेऊन त्यांच्या प्रमाणपत्रासह दिनांक ३० जून अखेरपर्यंत संबंधीत निबंधकांकडे पाठवावयाची आहे.

ड) सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे एनपीएची माहिती संकलीत करावी. एनपीए तारीख स्पष्टपणे नमूद करावी. सर्वसाधारणपणे प्रत्येक खात्याचे एनपीए होण्याची तारीख वेगळी असते. एनपीए ची माहिती कर्जप्रकाराप्रमाणे न करता कर्जदाराप्रमाणे तयार करावी. एकदा कर्जखाते एनपीए झाल्यावर पूर्ण थकबाकी भरल्याशिवाय त्याची एनपीए तारीख बदलू नये. एनपीएची माहिती बनविताना तारणाची संपूर्ण तपशिलवार माहिती द्यावी. सहतारण असल्यास त्याचाही तपशील द्यावा. तसेच त्याच्या मूल्यांकनाचाही तपशील द्यावा.

इ) एनपीएची तारीख काढणेसाठी उदा.

| | | |
|---|---|---|
| उदा. | कर्जदाराचे नाव | अ |
| | कर्ज रक्कम | रु. ५० हजार |
| | कर्ज दिल्याची तारीख | १-४-२००३ |
| | कर्जाचा पहिला हप्ता सुरु दिनांक | १-५-२००३ |
| | दरमहा हप्ता | रु. १,२००/- |
| | एकूण वसुली | रु. ५,०००/- |
| | संपूर्ण आलेले हप्ते (५,०००/१२-४.१६) | ४ |
| | थकीत तारीख (पहिला हप्ता सुरु दिनांक + आलेले चार हप्ते) | १-९-२००३ |
| | एनपीए तारीख (थकीत तारीख धरून + १२ हप्ते) | १-८-२००४ |

एनपीए वर्गीकरण, थकबाकीची रक्कम काढताना खातेदारांच्या इतर खात्यातून जमा केलेल्या रकमा, जमा केलेले परंतु परत आलेले चेक वगळावेत. मुदत कर्जाबाबत मुख्य कर्जाचा हप्ता देय नसला परंतु व्याज वरील तक्त्यातील मुदतीप्रमाणे थकीत असेल तर एनपीएच्या निकषाप्रमाणे वर्गीकरण करावे. जर एखाद्या सर्वसाधारण (Sub Standard) एनपीए खात्यात काही कारणाने तारणाची किंमत खूपच कमी झाली असेल अथवा कर्ज वसुलीचा दावा दाखल केला असेल तर कर्ज खाते सरळ संशयित (Doubtful) समजावे.

एकूण अनुत्पादित मालमत्ता व एकूण उत्पादित मालमत्ता यांचे गुणोत्तर काढण्याचे सूत्र.

१) एकूण कर्जे : पतसंस्थेची एकूण असणारी कर्ज रक्कम.

२) ढोबळ एनपीए : एनपीए स्टेटमेंटप्रमाणे आलेले एकूण एनपीए

३) येणे व्याज : ताळेबंदात दाखविलेली येणे व्याजाची रक्कम

४) तरतूद : ताळेबंदात दाखविलेली एनपीए तरतुदीची एकूण रक्कम

५) निव्वळ कर्ज : एकूण कर्ज (–) वजा येणे व्याज (–) वजा केलेली तरतूद

६) निव्वळ एनपीए : ढोबळ एनपीए वजा (–) येणे व्याज (–) केलेली तरतूद

ढोबळ एनपीए टक्केवारी (Gross NPA Percentage) =

(ढोबळ एनपीए / एकूण कर्ज) × १००

निव्वळ एनपीए टक्केवारी (Net NPA Percentage) =

(निव्वळ एनपीए / निव्वळ कर्ज) × १००

वरील गुणोत्तरात ढोबळ एनपीएची टक्केवारी २०% पेक्षा जास्त व निव्वळ एनपीएची टक्केवारी १५% पेक्षा जास्त असू नये.

सही/-

सहकार आयुक्त व निबंधक

सहकारी संस्था म. रा. पुणे यांचेकरिता

प्रपत्र क्र. १

पतसंस्थेचे नाव ____________________

दिनांक ३१-३-२०० अखेर एकूण कर्जाचे पृथ्थकरण

| उत्तम जिंदगी कर्ज | | अनियमित कर्ज | | संशयित कर्ज १ | | संशयित कर्ज २ | | संशयित कर्ज ३ | | बुडित कर्ज | | तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खाते | येणे रक्कम | खाते | येणे रक्कम | खाते | येणे रक्कम | खाते | येणे रक्कम | खाते | येणे रक्कम | खाते | येणे रक्कम | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

**संस्थांनी ठेवावयाची एनपीए ची यादी**

पतसंस्थेचे नाव ____________________

एनपीए दिनांक

| अ. क्र. | खाते क्र. | कर्जदाराचे नाव | मंजूर रक्कम | मंजूर दिनांक | येणे बाकी | थकबाकी दिनांक | थक-बाकी | थकीत हप्ते | एनपीए दिनांक | येणे व्याज | तरतुदीसाठी येणेबाकी | तारण | तारण मुल्य | तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२=६+११ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

## प्रपत्र क्र. २

पतसंस्थेचे नाव

### दिनांक ३१-३-२०० अखेरचा निष्क्रीय जिंदगी दाखविणारा तक्ता

| मालमत्तेचे वर्गीकरण | खाते संख्या | येणेबाकी | येणेव्याज | तरतुदीसाठी येणेबाकी | येणेबाकीशी प्रमाण | शेकडा तरतूद | एकूण तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५=३-४ | ६ | ७ | ८=५×७/१०० |
| अ) उत्पन्न देणारी कर्ज (Standard Assets) | | | | | | ०% | |
| ब) १) अनियमीत कर्ज (Sub-standard Assets) | | | | | | ५% | |
| २) संशयित (Doubtful Assets) | | | | | | | |
| संशयित (१) तारणी | | | | | | १०% | |
| संशयित (१) विनातारणी | | | | | | १००% | |
| संशयित (२) तारणी | | | | | | २०% | |
| संशयित (२) विनातारणी | | | | | | १००% | |
| संशयित (३) तारणी | | | | | | ३०% | |
| संशयित (३) विनातारणी | | | | | | १००% | |
| एकूण तारणी | | | | | | | |
| विनातारणी | | | | | | | |
| ३) बुडित कर्जे (Loss Assets) | | | | | | १००% | |
| क) अफरातफरीच्या रकमा | | | | | | १००% | |
| ड) ठेव खात्यावरील नावे रकमा | | | | | | १००% | |
| एकूण एनपीए ब + क + ड | | | | | | | |

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा. क्र. ना. बँका/डी-४/पतसंस्था/एनपीए/२००४
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक २१ डिसेंबर २००४

# परिपत्रक

## संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक जा. क्र. ना. बँका/डी-४ / पतसंस्था / एनपीए / २००४ / ८०२ दिनांक १०/११/२००४

नागरी/पगारदार सहकारी पतसंस्थांसाठी दिनांक १०-११-२००४ नुसार एनपीएची तरतूद लागू करण्यात आलेली असून त्यानुसार सोबत तपशील जोडण्यात आलेला आहे. सदर परिपत्रकीय सूचनेमध्ये खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आलेला आहे. पान क्र. १ मुद्या क्रमांक ६.

एनपीए म्हणजे एखाद्या कर्जखात्यावरील व्याजाचा हप्ता किंवा कर्जाचा हप्ता किंवा कर्ज व व्याजाचा हप्ता हा ठरवून दिलेल्या कालावधीनंतरही वसूल न झाल्यास असे खाते एनपीए होय.

पान क्र. ७ वर एनपीए बाबतच्या सूचना मधील १) मधील ब) मध्ये एनएससी इंदीरा/किसान विकास पत्रे इत्यादी बचत कर्जे व सोने तारण कर्जे. प्रपत्र क्रमांक २ मध्ये स्तंभ क्रमांक ७ शेकडा तरतूदमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.

| | या ऐवजी | असे वाचावे. |
|---|---|---|
| मालमत्तेचे वर्गीकरण | पूर्वी नमूद केलेली टक्केवारी | सध्या लागू असलेली टक्केवारी |
| २) संशयित कर्जे (Doubtful Asset) | | |
| संशयित (१) तारणी | १०% | १०% |
| संशयित (१) विनातारणी | १००% | ५०% |
| संशयित (२) तारणी | २०% | १५% |
| संशयित (२) विनातारणी | १००% | ५०% |
| संशयित (३) तारणी | ३०% | २०% |
| संशयित (३) विनातारणी | १००% | ५०% |

सदर बदल तात्काळ नागरी/पगारदार सहकारी पतसंस्थांचे निदर्शनास आणून देण्यात यावेत.

सही/-
**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति, १) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन) (सर्व) २) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) (सर्व) ३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व) ४) जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था (सर्व) ५) तालुका उपनिबंधक/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सर्व)

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा.क्र.ना. बँका/डी-४/पतसंस्था/एनपीए/२००५
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक ९ मे २००५

# परिपत्रक

विषय : नागरी सहकारी पतसंस्थांना एन.पी.ए. निकष लागू करणेबाबत....

संदर्भ : १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक सम, दिनांक १०-११-२००४
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक सम, दिनांक २१-१२-२००४

नागरी सहकारी पतसंस्थांना या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक १०-११-२००४ नुसार एन.पी.ए. तरतूद लागू करण्यात आलेली आहे व सदर तरतूदीचे प्रमाण दिनांक २१-१२-२००४ च्या परिपत्रकान्वये कमी करण्यात आलेले आहे. राज्यातील नागरी सहाकरी पतसंस्थांच्या अडचणी व निवेदने विचारात घेऊन नागरी सहकारी पतसंस्थांसाठी दिनांक ३१-३-२००५ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षीपासून लागू करण्यात आलेली एन.पी.ए. तरतूद त्यामध्ये बदल करून ते दिनांक ३१-३-२००६ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षापासून लागू होतील.

या सूचनांचे सर्व नागरी/ग्रामीण बिगरशेती/पगारदार सहकारी पतसंस्थांकडून काटेकोरपणे पालन केले जाईल असे पहावे.

सही/-
अप्पर निबंधक, सहकारी संस्था
(तपासणी व निवडणुका) महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (ले.प.) (सर्व)
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४) जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था (सर्व)
५) तालुका उपनिबंधक/सहाय्यक सहकारी संस्था (सर्व)

आपणास कळविण्यात येते की, वरील परिपत्रकीय सूचना आपल्या विभाग/जिल्हा/तालुक्यातील सर्व नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

जा.क्र.ना.बँका/डी-४/पतसंस्था/एनपीए/२००४/०६
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक : १२-०६-२००६

# परिपत्रक

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थांच्या एन.पी.ए. बाबत....**
**संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक समक्रमांक दि. १०-११-२००४**

उपरोक्त विषय व संदर्भाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

संदर्भिय परिपत्रकान्वये एन.पी.ए. संदर्भात सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. दिनांक ३१-३-२००६ पासून पतसंस्थाना एन.पी.ए. च्या तरतुदी करावयाच्या आहेत. त्यामुळे आता पतसंस्थाना एन.पी.ए. तरतुदी कराव्या लागणार आहेत. परंतु गेल्या वर्षात राज्यात झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या काही भागात पडलेला दुष्काळ व काही भागात झालेली अतिवृष्टी व शेतमालाला मिळालेला कमी भाव इ. बाबींमुळे संस्थांची थकबाकी पुरेशा प्रमाणात वसूल झालेली नाही. या बाबींचा विचार करता, एन.पी.ए. निकषाला मुदतवाढ न देता निकषाप्रमाणे कराव्या लागणाऱ्या तरतूदांला जर काही प्रमाणात सवलत दिल्यास त्यातून चांगला मार्ग निघू शकतो व पतसंस्थावर एकदम येणारा तरतुदीचा बोजाही कमी होऊ शकतो. त्यामुळे मार्च २००६ पासून कराव्या लागणाऱ्या तरतुदीची एकूण रक्कम पुढीलप्रमाणे चार टप्प्यात विभागून तरतूद करावयास या परिपत्रकाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | वर्ष | मार्च २००६ अखेरील एन.पी.ए. तरतुदीची करावयाची विभागणी |
|---|---|---|
| १) | मार्च २००६ | २५% |
| २) | मार्च २००७ | २५% |
| ३) | मार्च २००८ | २५% |
| ४) | मार्च २००९ | २५% |

मात्र अशाप्रकारे एन.पी.ए. तरतुदीची विभागणी करताना खालील बाबींची दक्षता संस्थेने घेणे आवश्यक आहे.

१) मार्च २००६ रोजी एन.पी.ए. च्या वर्गीकरणाप्रमाणे एकूण करावयाची तरतूद निश्चित झाल्यानंतर त्याचे २५% प्रमाणे चार भाग करुन त्यापैकी २५% रकमेची (पहिला भाग) तरतूद ३१ मार्च २००६ रोजीच्या ताळेबंदात एन.पी.ए. तरतूद म्हणून करावयाची आहे.

उदाहरणार्थ "अ" या संस्थेने ३१ मार्च २००६ रोजीच्या वर्गीकरणानुसार एकूण करावयाची तरतूद खालीलप्रमाणे आहे....

| अ. क्र. | वर्ष | करावयाची तरतूद | दि. ३१ मार्च २००६ रोजी केलेली तरतूद | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | उत्पादीत/उत्तम/एकूण जिंदगी Standard Asset | --- | --- | |
| २) | अनियमितजिंदगी Sub-Standard Asset | ५% | २०/- | २०/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३) | संशयित जिंदगी | तारणी | विनातारणी | तारणी | विनातारणी | |
| | Doubtful Asset | | | | | |
| | संशयित-१ | १०% | ५०% | १०/- | १५/- | २५/- |
| | संशयिल-२ | १५% | ५०% | १०/- | १५/- | २५/- |
| | संशयित-३ | २०% | ५०% | १०/- | -१०/- | २०/- |
| ४) | बुडीत कर्ज | १००/- | | १०/- | | १०/- |
| ५) | एकूण | १००/- | | | | |

म्हणजे ३१ मार्च २००६ रोजी एन.पी.ए. वर्गीकरणानुसार अ संस्थेस रु. १०० ची तरतूद करावयाची आहे. त्यापैकी २५% म्हणजेच रु. २५/- इतक्या रकमेची दि. ३१ मार्च २००६ च्या ताळेबंदामध्ये प्रत्यक्ष तरतूद करावयाची आहे.

२) २५% रकमेची तरतूद ३१ मार्च २००६ या ताळेबंदात केल्यानंतर उर्वरित ७५% रक्कम म्हणजेच रु. ७५/- याबाबत संस्थेने त्यांचे ताळेबंदामध्ये फूट नोट करुन त्यामध्ये संस्थेस एकूण करावयाच्या १००% तरतुदीपैकी चालू वर्षी २५% रकमेची तरतूद केलेली असून उर्वरित ७५% रकमेची तरतूद प्रत्येकी २५ प्रमाणे पुढील तीन वर्षात करणार आहे असे नमूद करावयाचे आहे. (अशा प्रकारे प्रत्येक वर्षी फूट नोट करुन) तरतूद केलेली व करावयाची रक्कम याचा उल्लेख त्या त्या टप्प्यात करावा.

३) फक्त ३१ मार्च २००६ रोजी एन.पी.ए. वर्गीकरणानुसार करावयाच्या तरतुदी चार टप्प्यात विभागणी करुन (२५% प्रमाण) करावयाची आहे. मार्च २००७ पासून एन.पी.ए. च्या वर्गीकरणानुसार करावयाची तरतूद १००% करावयाची आहे.

४) सदर बाबी लेखापरिक्षकांनी त्या त्या वेळी लेखापरिक्षण करताना तपासावयाच्या आहेत व प्रमाणित करावयाच्या आहेत.

उपरोक्तप्रमाणे एन.पी.ए. तरतुदी करताना या कार्यालयाने दि. १०-११-२००४ नुसार देण्यात आलेल्या सूचनांचेही काटेकोरपणे पालन करावे.

स्थळप्रतीवर मा. सहकार आयुक्त
यांची स्वाक्षरी असे

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे करिता

प्रत,

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेप) (सर्व)
३) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
४) जिल्हा विशेष उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
५) तालुका उपनिबंधक / सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (सर्व)

जा. क्र. ना. बँका/डी ४/एन.पी.ए./२००७
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे कार्यालय
दि. २०-२-२००७

विषय : एन.पी.ए. ठरवून दिलेल्या कालावधीबाबत ...

संदर्भ : १) या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक १०-११-२००४
२) या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ९-५-२००५

संदर्भिय परिपत्रकान्वये नागरी सहकारी पतसंस्था व सेवक सहकारी पतसंस्थांकरिता एन.पी.ए.साठी ठरवून दिलेला कालावधी खालीलप्रमाणे होता.

| अ. क्र. | वर्षाअखेर ३१ मार्च | एनपीए ठरवून दिलेला थकीत कालावधी/निकष |
|---|---|---|
| १) | २००५ | ४ तिमाही (१२ महिने) |
| २) | २००६ | ४ तिमाही (१२ महिने) |
| ३) | २००७ | ३ तिमाही (९ महिने) |
| ४) | २००८ | २ तिमाही (६ महिने) |

सदर परिपत्रकाप्रमाणे ३१ मार्च २००५ अखेरपासून सर्व नागरी सहकारी पतसंस्था व सेवक सहकारी पतसंस्थांना एन.पी.ए.चे निकष लागू करण्यात आलेले होते. तथापि संदर्भिय दि. ९-५-२००५ रोजीच्या परिपत्रकान्वये नागरी सहकारी पतसंस्थांसाठी दि. ३१ मार्च २००५ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात आलेली एन.पी.ए. तरतूद यामध्ये बदल करून एन.पी.ए. चे निकष दिनांक ३१ मार्च २००६ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात आलेले आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे एन.पी.ए. साठी ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये बदल करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | वर्षाअखेर ३१ मार्च | एनपीए ठरवून दिलेला थकीत कालावधी/निकष |
|---|---|---|
| १) | २००६ | ४ तिमाही (१२ महिने) |
| २) | २००७ | ४ तिमाही (१२ महिने) |
| ३) | २००८ | ३ तिमाही (९ महिने) |
| ४) | २००९ | २ तिमाही (६ महिने) |

सर्व विभागीय सहनिबंधक/जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, सदर बाब आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पतसंस्थांच्या निदर्शनास आणून द्यावी व आपल्या विभागामध्ये/जिल्ह्यामध्ये सदर परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही होईल असे पहावे. त्याबाबतची संपूर्णपणे जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

अप्पर निबंधक सहकारी संस्था
(तपासणी व निवडणुका) महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति, १) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व) २) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व) ३) अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., मुंबई ४) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन

जा.क्र.ना. बँका/डी-४/एन.पी.ए./मुदत/०८
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय
दिनांक :- २१-७-२००८

# परिपत्रक

विषय : एन.पी.ए. ठरवून दिलेल्या कालावधीतबाबत....

संदर्भ : १. या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक १०-११-२००४
२. या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ९-५-२००५ व २०-२-२००७

सर्व नागरी सहकारी पतसंस्था व सेवक सहकारी पतसंस्थांना दिनांक ३१-३-२००६ पासून एन.पी.ए.चे निकष लागू करण्यात आलेले आहेत. त्यानुसार संदर्भिय दि. २०-२-२००७ रोजीच्या परिपत्रकान्वये नागरी सहकारी पतसंस्था व सेवक सहकारी पतसंस्थांसाठी दि. ३१ मार्च २००६ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात आलेली एन. पी. ए. तरतुदीमधील थकीत कालावधीत बदल करुन संदर्भिय दिनांक-२०-२-२००७ चे परिपत्रकान्वये नागरी सहकारी पतसंस्था व सेवक सहकारी पतसंस्थांकरिता एनपीए साठी खालील प्रमाणे कालावधी ठरवून देण्यात आलेला होता.

| अ. क्र. | वर्षाअखेर ३१ मार्च | एनपीए ठरवून दिलेला थकीत कालावधी/निकष |
|---|---|---|
| १) | २००७ | ४ तिमाही (१२ महिने) |
| २) | २००८ | ३ तिमाही (९ महिने) |

तथापि सद्यस्थितीत राज्यातील काही नागरी सहकारी पतसंस्थांमधील ठेवी परत मिळण्यात अडचणी निर्माण झाल्याने सर्वच पतसंस्थांबाबत ठेवीदारांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झालेले आहे. अशा परिस्थितीत अनेक प्रकरणात कर्जदाराकडे पाठपुरावा करुन कर्ज वसुली करणे तितक्याशा प्रकरणात शक्य झाले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना झालेल्या कर्जमाफीबाबत त्याप्रमाणात कर्ज वसुली न झाल्यानेही थकबाकीचे व एनपीए चे प्रमाण वाढलेले आहे. दरम्यान निर्माण झालेल्या वातावरणाचा फायदा अनेक थकबाकीदार कर्जदारांनी घेऊन नियमित परतफेड करीत असलेली कर्जखातीही थकवलेली आहेत. अशा कर्जदारांकडून कर्जवसूली करण्यासाठी कायदेशीर बाबींचा अवलंब करावा लागत असल्यामुळे त्यासाठी काही कालावधी लागत आहे. अशा परिस्थितीत एनपीए च्या कालावधीत बदल न झाल्यास अशी कर्जखाती संशयित व बुडीत या संवर्गात येऊन त्यासाठी करावी लागणारी एनपीए प्रोव्हीजन ही मोठ्या प्रमाणात करावी लागणार असून, पर्यायाने त्याचा परिणाम संस्थेच्या ताळेबंदावर होऊन काही पतसंस्था तर तोट्यामध्येही येणार आहेत.सद्यस्थितीत अशाप्रकारे संस्था तोट्यात आल्यास त्याचे विपरीत परिणाम पतसंस्था चळवळीवर होणार असून, अडचणीतील पतसंस्थांची संख्या वाढण्याची शक्यता असल्यामुळे मार्च २००८ अखेरील एनपीए कालावधी १२ महिन्यांचा करण्याबाबत पतसंस्था फेडरेशन तसेच अनेक पतसंस्थांनी विनंती केलेली आहे.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता एन. पी. ए. साठी ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | वर्षाअखेर ३१ मार्च | एनपीए ठरवून दिलेला थकित कालावधी/निकष |
|---|---|---|
| १) | २००८ | ४ तिमाही (१२ महिने) |
| २) | २००९ | ३ तिमाही (९ महिने) |
| ३) | २०१० | २ तिमाही (६ महिने) |
| ४) | २०११ | १ तिमाही (३ महिने) |

सर्व विभागीय सहनिबंधक/जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, सदर बाब आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पतसंस्थांच्या निदर्शनास आणून द्यावी व आपल्या विभागामध्ये/जिल्ह्यामध्ये सदर परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही होईल असे पहावे त्याबाबतची संपूर्णपणे जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

**अपर निबंधक सहकारी संस्था**
**(तपासणी व निवडणुका) महाराष्ट्र राज्य पुणे**

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या, मुंबई
४) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन